# बृहन्मुंबई महानगरपालिका

# नियमपुस्तिका

## प्रमुख अभियंता
## (मलनि:सारण प्रकल्प खाते)

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत कलम 4(1)(ब) नुसार
दि.01.05.2022 पर्यंत अद्ययावत

# प्रस्तावना

दि. 15 जून 2005 रोजी लोकसभेच्या माहितीच्या अधिकार अधिनियम 2005 करिता राष्ट्रपतींची अनुमती प्राप्त झाली.

प्रत्येक नागरी प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील माहिती प्राप्त करण्यासाठी तसेच नागरी प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी आणण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि नागरिकांकरिता माहितीच्या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा हया अधिनियमाचा हेतू आहे.

अधिनियमानुसार सर्व अभिलेख सूचीबध्द आणि अनुक्रमाणिकायुक्त पध्दतीने ठेवणे नागरी प्राधिकरणास बंधनकारक आहे, जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करणे सुविधाजनक होईल. तसेच 12 ऑक्टोंबर 2005 रोजी माहितीच्या अधिकारामध्ये नागरी संस्थांबाबत विशेषत्वाने नमुद केल्याप्रमाणे माहिती जाहिर करणे हे नागरी प्राधिकरणाला बंधनकारक आहे.

माहिती अधिनियमातील तरतुदींची पूर्तता करण्याच्या हेतूने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी खात्यापैकी एक असलेल्या प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खात्याकरिता असलेल्या निरनिराळया नियमांची माहिती नियम पुस्तिका स्वरुपात पुढील पृष्ठावर दिलेली आहे.

मलनि:सारण खात्यातील उप प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) नियोजन व संकल्प चित्रे आणि उप प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) बांधकामे हया दोन विभागांची माहिती विशेषत्वाने हया नियमपुस्तिकेत नोंदविलेली आहे. नियमपुस्तिका स्वरुपात विविध शिर्षांतर्गत हस्तपुस्तिकेतील माहितीची मांडणी केली आहे.

नियमपुस्तिकेमध्ये जेथे `महानगरपालिका` हा शब्दप्रयोग केला आहे ते म्हणजे `बृहन्मुंबई महानगरपालिका` आणि जेथे `खाते ` हा शब्दप्रयोग केला आहे ते म्हणजे प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खाते तसेच `प्रमु. अ., उप प्र. अभि., कार्य. अभि., स. अभि., दु. अभि., प्रशा. अधि., मु.लि, एच.डी., डी.मॅन` म्हणजेच अनुक्रमे `प्रमुख अभियंता, उप प्रमुख अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, दुय्यम अभियंता, प्रशासकीय अधिकारी, मुख्य लिपिक, मुख्य आरेखक, आरेखक` असे समजावे.

प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) हे खाते उपायुक्त (अभियांत्रिकी) आणि अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांच्या अधिपत्याखाली प्रशासकीयदृष्टया येते.

`अर्थसंकल्प ग` निधी 40 म्हणजेच पाणी पुरवठा व मलनि:सारण अंतर्गत येणा-या प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खात्याचे प्रमुख कार्य मुंबईमध्ये निर्माण झालेला मलप्रवाह वाहून नेण्यासाठी मलनि:सारण वाहिन्या पुरविणे व टाकणे हे आहे.

हया हस्तपुस्तकात समाविष्ट न केलेल्या इतर अतिरिक्त माहितीकरीता या खात्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटता येईल. सर्वसाधारण माहिती प्रशासकीय अधिका-यांना कडून उपलब्ध होऊ शकेल. तथापि, तपशीलवार/ विविक्षित माहितीकरीता अधिनियमातील तरतुदींचे अनुसरण करावे.

**खात्याचे नावः प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प)**

**खात्याची संक्षिप्त ओळख -**

बृहन्मुंबईतील मलनि:सारण पध्दतीची व्यवस्था ही योजनाबध्द आहे आणि कुलाबा, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, घाटकोपर आणि भांडूप हया सात मलनि:सारण परिमंडळांत विभागलेली आहे. उदंचन केंद्रांकडे जाणा-या मलवाहिन्यांचे नियोजन करुन त्या टाकण्याकरीता संकल्पचित्रे काढणे आणि पातमुखाकडे, एरिएटेड लगून्सकडे मलवाहून नेणा-या वाहिन्या टाकण्याचे काम प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) यांजकडे सोपविले आहे.

हे खाते प्रामुख्याने दोन विभागामध्ये विभागलेले आहे. (1) नियोजन व संकल्प चित्रे आणि (2) बांधकामे

| **प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प)** | |
|---|---|
| **उप प्रमुख अभियंता<br>(मलनिःसारण प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे** | **उप प्रमुख अभियंता<br>(मलनिःसारण प्रकल्प) बांधकामे** |


प्रमुख अभियंता
(मलनि:सारण प्रकल्प)
उप प्रमुख अभियंता
(नियोजन व संकल्प चित्रे)
उप प्रमुख अभियंता
(बांधकामे)
प्रशा. अधि. (सामान्य)
दुय्यम अभियंता
मुख्य लिपिक
वरिष्ठ लघुलेखक
लिपिक
कार्य. अभि. (शहर)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य आरेखक
आरेखक, अनुरेखक
कार्य. अभि. (प.उप)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य आरेखक
आरेखक, अनुरेखक
कार्य. अभि. (पू.उप)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य आरेखक
आरेखक, अनुरेखक
प्रशा. अधि. (नि. व सं. चि.)
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक
लिपिक
कार्य. अभि. (बां.९)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक, लिपिक
कार्य. अभि. (बां.१०)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक, लिपिक
कार्य. अभि. (बां.११)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक, लिपिक
कार्य. अभि. (मायक्रो)
सहा. अभियंता
दुय्यम अभियंता
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक, लिपिक
प्रशा. अधि. (बांधकामे)
मुख्य लिपिक
कनिष्ठ लघुलेखक
लिपिक
प्रशा. अधि. (आस्थापना)
मुख्य लिपिक
लिपिक

## मंजूर मनुष्यबळ

मनपा अधिनियम १८८८ कलम ७९ अन्वये कार्य संकेतांक ५२ करीता मलनि:सारण प्रकल्प खात्यासाठी मंजुर मनुष्यबळ -

| क्रमांक | पदनाम | अनुसुचीत पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमुख अभियंता | 1 | 1 | 0 |
| 2 | उप प्रमुख अभियंता | 2 | 1 | 1 |
| 3 | कार्यकारी अभियंता | 8 | 7 | 1 |
| 4 | प्रशासकीय अधिकारी | 4 | 4 | 0 |
| 5 | सहाय्यक अभियंता | 18 | 14 | 4 |
| 6 | दुय्यम अभियंता | 79 | 39 | 40 |
| 7 | वरिष्ठ लघुलेखक | 2 | 0 | 2 |
| 8 | मुख्य लिपिक | 9 | 7 | 2 |
| 9 | कनिष्ठ लघुलेखक | 6 | 1 | 5 |
| 10 | लिपिक | 40 | 16 | 24 |
| 11 | मुख्य आरेखक | 3 | 0 | 3 |
| 12 | आरेखक | 8 | 3 | 5 |
| 13 | अनुरेखक | 19 | 5 | 14 |
| 14 | हविलदार | 1 | 1 | 0 |
| 15 | नाईक | 2 | 1 | 1 |
| 16 | शिपाई | 33 | 30 | 3 |
|  | **एकूण** | **235** | **130** | **105** |